सायं. दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान •
BEED KISAN

## जातीवाचक शिवीगाळ करत ७५ वर्षीय महिलेला मारहाण; वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

वडवणी (किसान न्युज): गायीच्या विक्रीच्या कारणावरून झालेल्या वादातून ७५ वर्षीय महिलेला मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ केल्याची घटना चिंचाळा, ता. वडवणी परिसरात घडल्याची तक्रार वडवणी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. याबाबत कौसाबाई सोपान डावरे (वय ७५, रा. चिंचाळा, ता. वडवणी) यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिसांकडे तक्रार दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की चिंचाळा येथील रहिवासी असणाऱ्या कौसाबाई सोपान डावरे या दिनांक ६ सप्टेंबर रोजी दुपारी गावांमधून शेतात जात असताना रस्त्यातच गोविंद आजबे व त्यांची पत्नी यांनी कौसाबाई डावरे यांना रस्त्यात अडवून जातिवाचक शिवीगाळ करण्यास सुरुवात केली कौसाबाई डावरे या काही न बोलता शेतात निघून गेल्या असता गोविंद आजबे व त्याच्या पत्नीने » पान २ वर

बीड ▪ वर्ष ६ ▪ अंक १२४ ▪ बुधवार, दि. ०९ सप्टेंबर, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १० सप्टेंबर, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-6 ▪ Issue-124 ▪ Wednesday 09 September, 2026 ▪ Postal Date 10 September, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# आष्टीत २० क्रेशरवर कारवाया केल्या तश्या बीड तालुक्यात का नाही ?

# बीड तालुक्यात १९ खडी क्रेशर कोणत्या नियमात बसतात; पावती भरली म्हणजे नियमात झाले का ?

बीड । किसान न्युज

**बऱ्याच दिवसांनंतर जिल्हाधिकारी यांच्याकडून झबू आल्याने झोपेतून जागे झालेल्या गौण खनिज विभागाने जिल्हाभरात आष्टी, बीड, पाटोदा, अंबाजोगाई, माजलगाव, धारुर तालुक्यात खडी क्रेशर अन् खदाणींवर कारवाई करण्यात आली. पण यामध्ये आष्टी तालुक्यात शंभर टक्के खडी क्रेशरवर कारवाई करण्यात आली पण बीड तालुक्यात एकूण १९ खडी क्रेशर असून त्यापैकी एकावरच कारवाई झाल्याने ही कारवाई तोंड पाहून झाली का असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच ज्याप्रमाणे आष्टीत कारवाई झाली तशी बीडमध्ये का होत नाही. बीड तालुक्यातील सर्व क्रेशर नियमात आहेत का? की, त्यांचे काही लागेबांधे असणाऱ्यांकडे दुर्लक्ष झाले का? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.**

बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी खडीक्रेशर आणि खदाणी सुरू आहेत. मात्र येथे कोणतेही नियम पाळले जात नाहीत. तसेच येथील रॉयल्टी भरली जाते की, नाही हा प्रश्न असून, याबाबत नियमित ओरड होत असून, केवळ बीड मध्ये वाळू आणि मुरुम या गौण खनिजाची चर्चा होते मात्र खडीक्रेशर आणि खदाणींची चोरी आणि अवैध उत्खनन पडद्याच्या आता राहिले आहे. मात्र अशा परिस्थितीतही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष घालून याबाबत कारवाईचे आदेश दिले होते. यामुळे आता जिल्हाधिकारी यांनीच आदेश दिल्याने गौण खनिज विभागाचा ना विलाज झाला आणि त्यांनी जिल्ह्यात माराव्या करीत जवळपास ४० खडी क्रेशर आणि खदाणी सील केल्या आहेत. मात्र ही कारवाई चर्चेत आली असून, आष्टी तालुक्यात २० ठिकाणी कारवाई केली. ही संख्या शंभर टक्के आहे. पण बीड तालुक्यात एकूण १९ क्रेशर आणि खदाणी आहेत. पण यातील केवळ एकच ठिकाणी पोखरी येथील क्रेशरवर कारवाई करण्यात आली आहे. यामुळे बीड तालुक्यातील केवळ एकच क्रेशर नियम बाह्य आहे का? इतर १८ क्रेशर नियमात आहेत का? हे अतिशयोक्ती वाटत असून, बीडमध्येही आष्टी तालुक्या प्रमाणेच कारवाई अपेक्षित होती. मात्र तसे न झाल्याने संशय व्यक्त होत असून, बीडमध्ये कोणाचे लागेबांधे आहेत, त्यांच्यामुळेच ही कारवाई टाळण्यात आली असून तोंड पाहून कारवाई झाली का असा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच ते नियमात कसे असा प्रश्न उपस्थित करीत ते जाहीर करावे केवळ गौण खनिजाची पावती दाखवली म्हणजे ते अधिकृत होतात का? इतर नियमांचे काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## गौण खनिज पथक क्रेशरवाल्यांचा मिंदा आहे का?




### मंडळाधिकारी, तलाठ्यांना हाप्ता ?

**बीड तालुक्यात सुरू असलेल्या खडी क्रेशर आणि खदाणी चालकांकडून तालुक्यातील महसूल मंडळाधिकारी आणि तलाठी यांना प्रत्येक महिन्याला हाप्ता जात असल्याची चर्चा आहे. त्यांनी यात फिल्डिंग लावल्याने केवळ एकाच क्रेशरवर कारवाई झाली आणि इतरांना अभय देण्यात आला का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

## एलसीबीने कार मधून ७० किलो गांजा पकडला

### ३५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात



बीड । किसान न्युज

बीड शहरात अमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे खासबाग मंदिर रोड परिसरात एका पांढऱ्या रंगाच्या क्रेटा कारची तपासणी केली असता तब्बल ७०.०७ किलो गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत अंदाजे ३५ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाला पेट्रोलिंग करत असताना एका क्रेटा वाहनातून गांजाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने खासबाग मंदिर रोड परिसरात सापळा रचून संशयित वाहन थांबवले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. या प्रकरणी पोलिसांनी मोसिन वहाब खान (रा. अमरावती) यास ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (NDPS Act) अंतर्गत बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कारवाईमुळे बीड शहरातून अमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, गांजाचा एवढा मोठा साठा नेमका कुठून आणण्यात आला आणि तो कुठे पोहोचविण्यात येणार होता, याचा तपास आता » पान २ वर

## टीसी ठेवायचा की नाही पालकांचा अधिकार आहे

# मिलिया शाळेत प्रवेश घेतला म्हणजे लेकर विकत दिले नाहीत

### आज उद्या म्हणून पालकांना दोन वर्षापासून लटकून ठेवले?

बीड । किसान न्युज

**येथील मिलिया शाळेत रितसर अर्ज द्वारे मागणी करुनही टीसी देण्यास टाळाटाळ केली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. यामुळे पालक मेटाकुटीला आले आहेत. टीसी रोखून धरणाऱ्या या शाळेवर शिक्षण विभागाने कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

पालकांनी आपल्या पाल्याची टीसी मागीतल्यास ती देणे बंधनकारक असतानाही शहरातील मिलिया शाळेत याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. याचा अनेक पालकांना अनुभव आला असून रितसर अर्ज करुन टीसीची मागणी करुनही ती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. कधी मुख्याध्यापक असले तर क्लार्क नाही म्हणून परत पाठविण्यात येते तर कधी क्लार्क असेल तर मुख्याध्यापक नाही म्हणून परत पाठविण्यात येते. काही अडचणींमुळे पालकांना आपल्या पाल्यांची शाळा बदलावी लागत आहे. त्यांनी पाल्य नवीन शाळेत पाठविण्यास सुरुवात केली आहे. तेथे प्रवेश घेण्यासाठी टीसी आवश्यक आहे. मात्र मिलिया शाळेतून टीसी दिला जात नाही. नवीन शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यास रोखले जात आहे. यामुळे पालकांची गळचेपी तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. यामुळे शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष घालून टीसी रोखून धरणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

### कोण तो अली सर ?

**येथे टीसी मागण्यासाठी आलेल्या पालकांना मुख्याध्यापक असले तरी कोणते तरी आली सर असून त्यांना भेटायला सांगितले जाते. मात्र हे आली सर येथे कधीच नसतात. त्यांची भेट होत नाही. त्यांचा फोन कधी लागत नाही. लागला तर ते फोन घेत नाहीत. यामुळे हा प्रकार काय? हे पालकांच्या काही लक्षात येत नाही. यामुळे याकडे प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी करण्यात येत आहे.**

## रोजगार सेवकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा




बीड । किसान न्युज

नरेगाचे नाव बदलून व्ही.बी.जी रामजी करण्यात आले आहेत. यामध्ये अनेक त्रुटी आहेत. या प्लिकेशन मध्ये छेडछाड केली जात आहे. याचा सर्व ठपका रोजगार सेवकांवर फोडून कारवाई केली जात आहे. याच्या निषेधार्थ तसेच विविध मागण्यांसाठी आज बुधवारी (दि.९) जिल्ह्यातील रोजगार सेवकांचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला आहे.

प्रमाणिकपणे काम करणाऱ्या रोजगार सेवकांवर खोटे आरोप करून त्याची सुनावणी न घेता किंवा त्यांचे म्हणणे ऐकून न घेता अतिरिक्त रोजगार सेवक नेमला जातो. बीड जिल्ह्यात १५ ते २० रोजगार सेवकावर हल्ले झाले असून त्याचे गुन्हे नोंद केलेले आहेत याचे मुख्य कारण प्रशासनाने जी रामजी म्हणजेच मनरेगा मोकाट सोडलेली आहे. कोणत्याच प्रकारची पडताळणी होत नसल्याने सर्व भार ग्राम रोजगार सेवकांच्या वर आहे आणि मानधन कमी जबाबदारी मोठी असा प्रकार झालेला आहे. याच्या निषेधार्थ तसेच एनएमएमएस प्रणाली मधील त्रुटी दूर करू बाह्य ऑप्लिकेशन चा शिरकाव थांबवा तांत्रिक » पान २ वर

## पेठ बीड पोलिसांनी १० लाखांचा गुटखा पकडून दोन जणांना अटक केले

बीड । किसान न्युज



बीड शहरात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक करून विक्री करणाऱ्या दोघांना पेठ बीड पोलिसांनी ताब्यात घेत मोठी कारवाई केली. पोलिसांनी संबंधित वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा, तंबाखू तसेच स्कॉर्पिओ वाहन असा एकूण १० लाख ६३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे १०.२० वाजता पोलीस पथक बीड उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना एका पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ या वाहनातून गुटखा घेऊन एक व्यक्ती मांजरसुंबा हून बीडकडे येत असल्याची गोपनीय माहिती » पान २ वर




# गोवंश जप्तीचा हिशोब कुठे? गोशाळेत पोहोचलेल्या जनावरांचे काय झाले?

## २०२० ते २०२६ मधील सर्व कारवायांचे ऑडिट करा : सरवदे



बीड । किसान न्युज

**गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कारवाया केल्या जातात. वाहने पकडली जातात, गुन्हे दाखल होतात आणि जनावरे गोशाळांच्या ताब्यात दिली जातात. मात्र, कारवाईनंतर जप्त केलेल्या जनावरांचे पुढे काय होते? किती जनावरे गोशाळेत पोहोचली आणि आज त्यापैकी किती जिवंत आहेत? या प्रश्नाचे उत्तर आता पोलीस प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे. जप्त जनावरांची संख्या, गोशाळेच्या नोंदवहीतील संख्या आणि प्रत्यक्ष गोशाळेत उपलब्ध असलेली संख्या यांची पडताळणी केल्यास मोठी तफावत समोर येऊ शकते, अशी बाब पुढे येत आहे.**

गोशाळेत जप्त जनावरे दाखल केल्यानंतर ती शेतकऱ्यांकडे संगोपनासाठी दिल्याचे सांगितले जाते. यासाठी आधारकार्ड व इतर कागदपत्रांच्या आधारे नोंदी केल्या जातात. मात्र, त्या जनावरांचा प्रत्यक्ष ठावठिकाणा, संगोपनाची स्थिती आणि पुढील हस्तांतरण याची पडताळणी कोण करणार? असा प्रश्न उपस्थित करीत २०२० ते २६ मधील सर्व कारशायांचे ऑडिट करण्याची मागणी अजय सरवदे यांनी केली. गोवंश संगोपनाच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम घेतली जाते का, तसेच जप्त केलेली जनावरे पुन्हा विक्रीच्या व्यवहारात जात आहेत का, याची चौकशी आवश्यक आहे. काही ठिकाणी अवैध गोवंश तस्करीशी संबंधित व्यक्ती शेतकऱ्यांच्या माध्यमातून जप्त जनावरे कमी किमतीत खरेदी करतात का, याचाही तपास होणे गरजेचे आहे. सन २०२० ते २०२६ या कालावधीत बीड जिल्ह्यात गोवंशाच्या अवैध वाहतुकीविरोधात किती कारवाया झाल्या? किती वाहने जप्त झाली? किती जनावरे जप्त करण्यात आली? कोणत्या गोशाळांना किती जनावरे सुपूर्द करण्यात आली? त्यापैकी आज किती जनावरे संबंधित गोशाळांमध्ये आहेत? आणि शेतकऱ्यांकडे दिलेल्या जनावरांची आजची स्थिती काय आहे? या सर्व प्रश्नांची कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष पडताळणी करून उत्तरे देण्याची मागणी होत आहे. गोवंशाच्या » पान २ वर

## नरेगाच्या कुशल कामांची पेमेंट तात्काळ सुरु करा : अनिल जगताप



बीड । किसान न्युज

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा/जी-रामजी) अंतर्गत पूर्ण झालेल्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या कुशल कामांची बिले ऑनलाइन झाल्यानंतरही त्यांची पेमेंट प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात येत असल्याने आता शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. मंजूर, पूर्ण आणि ऑनलाइन बिले झालेल्या कामांची देयके कोणत्याही दबावाखाली रोखू नयेत; पारदर्शक नियमांनुसार तातडीने पेमेंट करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी केली आहे. नरेगा अंतर्गत ग्रामीण भागात गायगोठे, विहिरी, फळबाग लागवड, नाफेड अंतर्गत विविध कामे, सिमेंट रस्ते, खडीकरण यांसह अनेक वैयक्तिक व सार्वजनिक विकासकामे केली जातात. या कामांमधून ग्रामीण भागातील लाभार्थी, मजूर तसेच विविध यंत्रणांना आर्थिक आधार मिळतो. मात्र, कामे पूर्ण करून त्यांची कुशल बिले ऑनलाइन झाल्यानंतरही देयके प्रलंबित राहिल्याने संबंधित लाभार्थी व कामाशी निगडित घटक आर्थिक » पान २ वर